POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस

मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343

R.N.I. No. MAHMAR/2008/24720

• रिसोड जि.वाशीम • वर्ष १८ • अंक १७ • मंगळवार, दि. १६ ते २३ सप्टेंबर २०२५ • पृष्ठे ४ • किंमत १ रू.

## नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान

# लाखो नागरिकांना मिळणार नवदृष्टीचा लाभ

**मुंबई, दि. १२ : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर पासून 'नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान' महाराष्ट्रभर राबविले जाणार आहे. महात्मा गांधी यांच्या जयंती दिनी २ ऑक्टोबर पर्यंत चालणाऱ्या या उपक्रमात दहा लाखाहून अधिक नागरिकांची मोफत नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया व औषधोपचार करण्यात येणार आहेत.**

या विशेष मोहिमेतून मोतीबिंदू शस्त्रक्रियेनंतर रुग्णांना मोफत चष्मेवाटप केले जाणार असून काचबिंदूसह इतर नेत्रविकारांवरील निदान, सल्ला आणि उपचार देखील मोफत केले जाणार आहेत.

जिल्हा व तालुका स्तरावर शिबिरे

राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये, तालुका व गावपातळीवर नेत्र तपासणी शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. गाव, वस्ती, तांडे, पाडे यांसह दुर्गम भागातील नागरिकांना या शिबिरांचा थेट लाभ होईल. शस्त्रक्रियेची गरज असलेल्या रुग्णांना जिल्हा रुग्णालये व संलग्न वैद्यकीय संस्थांकडे पाठवून संपूर्ण मोफत शस्त्रक्रिया व औषधोपचार करण्यात येतील.

उपक्रमातील संस्थांचा व्यापक सहभाग

या अभियानात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, सार्वजनिक आरोग्य विभाग, महानगरपालिका, वैद्यकीय शिक्षण विभाग, नगरपालिका, इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, धर्मादाय रुग्णालये, महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजना, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, ईएसआयसी रुग्णालये तसेच खासगी नेत्र रुग्णालये व विविध सामाजिक संस्था या उपक्रमामध्ये सहभागी होणार आहेत. या सर्व संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून हा उपक्रम अधिक व्यापक आणि यशस्वी होणार आहे.

तळागाळातील नागरिकांसाठी मोठा दिलासा

नेत्ररोग उपचाराचा खर्च गरीब नागरिकांच्या खिशाला परवडणारा नसतो. अशा परिस्थितीत ही मोफत शिबिरे गरजू व वंचित घटकांसाठी मोठा दिलासा ठरणार आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील वृद्ध, शेतकरी, मजूर, महिला व ज्येष्ठ नागरिकांना नवदृष्टी मिळण्याचा मार्ग या उपक्रमातून खुला होणार आहे.

या उपक्रमाचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशातूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविला जात आहे. प्रत्येक गरजू नागरिकांपर्यंत पोहचण्याकरिता सर्व शासकीय यंत्रणा प्रयत्न करत आहे.

यामुळे लाखो रूग्णांवर मोफत नेत्र तपासणी आणि शस्त्रक्रियेसह औषधोपचार केले जाणार आहेत. या शिबिराचा लाभ राज्यातील गरजू रूग्णांनी घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

## नेपाळमधील परिस्थितीबाबत महाराष्ट्रातील नागरिकांसाठी महत्त्वाच्या सूचना

वाशिम (जिमाका) - सध्या नेपाळमध्ये प्रवास टाळावा. जे महाराष्ट्रातील नागरिक सध्या नेपाळमध्ये आहेत, त्यांनी आपल्या निवासस्थानीच सुरक्षित राहावे. अनावश्यकपणे बाहेर पडू नये व स्थानिक प्रशासन तसेच भारताच्या दूतावासाच्या सूचनांचे पालन करावे.

कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी खालील दूतावासाच्या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा : +९७७-९८०८६०२८८१ (व्हॉट्सॲप कॉलसाठीही उपलब्ध) +९७७-९८१०३२६१३४ (व्हॉट्सॲप कॉलसाठीही उपलब्ध) राज्य आपत्कालीन कार्य केंद्र, महाराष्ट्र हे नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करत असून, अधिकृत माध्यमांद्वारेच माहिती मिळवावी आणि अफवांपासून दूर राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य आपत्कालीन कार्य केंद्राचे हेल्पलाईन क्रमांक : +९१-९३२१५८७१४३ (व्हॉट्सॲप कॉलसाठी उपलब्ध) +९१-८६५७११२३३३ (व्हॉट्सॲप कॉलसाठी उपलब्ध) असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी दिली आहे.

# सेवा पंधरवड्यासाठी रिसोड महसूल प्रशासन सज्ज






**वाशिम (जिमाका) महसूल विभागाच्या वतीने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत 'सेवा पंधरवडा' साजरा करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर रिसोड तालुक्यातील महसूल प्रशासनाने विशेष तयारी सुरू केली आहे. तहसील कार्यालय, रिसोड येथे तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या प्रमुख उपस्थितीत महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेण्यात आली.**

बैठकीत तालुक्यातील शेत रस्ते व पाणंद रस्त्यांचे सीमांकन करून त्यांना क्रमांक देणे, नकाशावर रस्त्यांची नोंद करणे, तसेच समाधान शिबिरे आणि संवाद सभेद्वारे तक्रारींचे त्वरित निराकरण करण्याचे ठरले. गृहनिर्माण योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याचा निर्णयही घेण्यात आला.

सेवा पंधरवडा अधिक प्रभावी करण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्यात युवा संवाद, शेतकरी संवाद सभा, ग्रामसभा, निबंध स्पर्धा, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर, 'जिवंत सातबारा' उपक्रम आणि विमुक्त भटक्या जमातींसाठी 'आदिशेतू' योजना यांचा समावेश आहे. तसेच बंजारा तांड्यांना महसूली गावाचा दर्जा देणे आणि गावनिहाय अनाथ मुलांना शासनाच्या योजनांचा लाभ देणे यासंदर्भातही निर्णय घेण्यात आले.

समाधान शिबिरे व स्मशानभूमी नियोजन

रिसोड तालुक्यात २९ व ३० सप्टेंबर रोजी मंडळ स्तरावर समाधान शिबिरे आयोजित करण्यात येणार असून शेतकरी संवाद सभेद्वारे रस्त्यांशी संबंधित तक्रारींचे तातडीने निराकरण केले जाईल. ज्या गावांमध्ये स्मशानभूमी नाही, त्या ठिकाणी जागा निश्चित करण्यासाठी संबंधित गावांनी प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश तहसीलदार तेजनकर यांनी दिले आहेत. बैठकीत नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी आणि महसूल विभागातील कर्मचारी उपस्थित होते. रिसोड तालुक्यातील सर्व नागरिकांनी सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत आयोजित शिबिरे, ग्रामसभा व कार्यक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी व्हावे. असे आवाहन तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी केले आहे.

# रिसोड तालुक्यात शेत रस्ते / पाणंद रस्ते बाबत शेतकरी संवाद सभेचे आयोजन

**रिसोड : रिसोड तालुक्यातील शेतकरी बांधवांच्या शेत रस्ते व पाणंद रस्ते यांसंबंधी असलेल्या तक्रारी व समस्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी प्रतीक्षा तेजनकर, तहसीलदार रिसोड यांच्या अध्यक्षतेखाली, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन रिसोड,/ पोलिस निरीक्षक पोलीस स्टेशन शिरपूर, उपअधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, रिसोड यांच्या उपस्थितीत संयुक्त शेतकरी संवाद सभेचे आयोजन करण्यात येत आहे.**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या

### ■ सहभागी होण्याचे तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर यांचे आव्हान

महसूल सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत दिनांक २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत रिसोड तालुक्यात प्रत्येक मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबीर दरम्यान दिनांक २९.०९.२०२५ व ३०.०९.२०२५ रोजी शेतकरी जनसंवाद सभांचे आयोजन करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तहसील कार्यालय, रिसोड येथे शेतकरी बांधवांच्या तक्रारींचे प्रशासनाशी थेट संवादाद्वारे निराकरण व्हावे यासाठी प्रतीक्षा तेजनकर, तहसीलदार रिसोड यांच्या मार्गदर्शनाखाली दर सोमवारी नियमितपणे शेतकरी संवाद सभेचे आयोजन करण्यात येत आहे. महसूल पंधरवडा निमित्ताने या सभांचे मंडळ स्तरावर विशेष आयोजन करण्यात आले असून, शेतकरी बांधवांनी



आपल्या शेत रस्ते व पाणंद रस्ते यांसंबंधीच्या तक्रारी व अडचणी सभेत मांडून त्यांचे निराकरण करून घेण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रतीक्षा तेजनकर, तहसीलदार यांनी केले आहे आहे.

## रब्बी हंगाम २०२५-२६ साठी शेतकरी गटांना अर्ज करण्याचे आवाहन

वाशिम (जिमाका) राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान तसेच राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये गहू, कडधान्य, पौष्टिक तृणधान्य, ऊस, करडई, मोहरी आणि सूर्यफुल या पिकांच्या उत्पादकता वाढीसाठी पीक प्रात्यक्षिक कार्यक्रम राबविण्यात येत आहे.कोण अर्ज करू शकतात? ३१ मार्च २०२४ पूर्वी कोणत्याही शासकीय यंत्रणेकडे नोंदणीकृत शेतकरी गट शेतकरी उत्पादक कंपनी कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्था अर्ज प्रक्रिया : अर्ज करण्याची सुविधा महाडीबीटी पोर्टलवर २ सप्टेंबर पासून) उपलब्ध आहे. गटांची निवड प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (एफसीएफएस) या तत्वावर केली जाईल. अर्ज करण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवरील बियाणे वितरण, प्रात्यक्षिक, फ्लेक्सी घटक, औषधे आणि खते या टाईल अंतर्गत अर्ज करता येईल. अर्ज करणाऱ्या व लाभ घेणाऱ्या प्रत्येक गट सदस्याकडे FarmeID असणे बंधनकारक आहे. लाभ : पिक प्रात्यक्षिकांद्वारे आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे. बियाणे, खते, औषधे व तांत्रिक मार्गदर्शनाची सुविधा. अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. अर्ज करण्यासाठी लिंक : महाडीबीटी पोर्टल जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी सर्व शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी व सहकारी संस्था यांना या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# सूक्ष्म सजीवांचे ‘जग’

मनात विचार आला की, पृथ्वीवरच्या प्राण्यांमध्ये भूपृष्ठावर हत्ती किंवा पूर्वीचे महाहत्ती (ऍमथ), त्यापूर्वी अक्राळविक्राळ डायनॉसोर, ऍनाकोंडासारखे आजही आफ्रिकेत आढळणारे सरपटणारे सजीव, पाण्यातील प्रचंड सुसरी आणि दहा हत्ती पोटात सामावून घेण्याची क्षमता असलेले नील देवमासे (ब्लू व्हेल). तसेच आकाशात उंच भरारी घेणारे, प्रसंगी हरिणासारखं ‘भक्ष्य’ उचलून उडणारे गरुड ही किती प्रकारची ‘महाकाय’ मंडळी पृथ्वीवर अवतरली! त्यातले डायनॉसोर वगळता बाकीची आहेतच. आपण त्यातले बरेच सजीव प्राणिसंग्रहालयात पाहतो. मग याच्या दुसऱ्या टोकाचे अतिसूक्ष्म सजीव कसे असतात? त्यापैकी काही तर सातत्याने आपल्या भेटीला येत असतात. काही दिसणार नाहीत इतके सूक्ष्म, तर काही लवकर हाती लागणार नाहीत असे चपळ. पावसाळ्यात तर अर्थवर्म किंवा गांडूळ अनेक ठिकाणी दिसतात. ओलसर जागी ती बरोबर निसर्गक्रमाने येतात. जमीनही भुसभुशीत करून शेतकऱ्याला मदत करतात. त्यामुळे अर्थवर्म फार्मिंग ही कल्पना जगात सर्वत्र प्रत्यक्षात आणली जाते.

मात्र त्याचबरोबर पिकांवर डल्ला मारणारे विविध कीटक, अळ्या, जमिनीतील उधई (वाळवी) तसेच घराचा ताबा घेणारी झुरळं, डास-मच्छर, माश्या, डोळ्यांभोवती घोंगावणारी चिलटं यांचा ‘बंदोबस्त’ वेळीच करावा लागतो. अशा कीटकांवर कविता वगैरे लिहिणं कठीणच, परंतु श्रेष्ठ विडंबनकार आणि चतुरस्त्र लेखक आचार्य अत्रे यांनी त्यांच्या ‘झेंडूची फुले’ या काव्यसंग्रहात दोन कविता लिहिल्या आहेत. एक आहे ‘पाहुणे’ घरात अनाहूतपणे ठाण मांडून बसणाऱ्या पाहुण्यांचे वर्णन आचार्य अत्रे यांनी मिश्कीलपणे असे केलंय ‘डास, चिलटे, घुंगुरटी, बाळा रे जेथूनि येती’ तिथून हे असले नकोसे पाहुणे येतात असे एक कष्टी माता डोळ्यांत पाणी आणून आपल्या लहान मुलाला सांगते. दुसरी कविता सतत घोंगावणाऱ्या, घरात अन्नावर भिरभिरणाऱ्या माश्यांवर. त्या कवितेचे शीर्षक आहे ‘कषायपेयपात्र पतित मक्षिकेप्रत!’ म्हणजे चहाच्या कपात पडलेल्या माशीला उद्देशून! असेसुद्धा काव्य विषय असू शकतात हे प्रभावी विडंबनकारच जाणू शकतो. तर जगातला सर्वात सूक्ष्म सजीव आकाराने एका मिलिमीटरच्या २००व्या भागाइतकाही ‘अतिसूक्ष्म’ असू शकतो. सतत वाचन करणाऱ्याला चेष्टेने ‘पुस्तकी किडा’ म्हणतात. असा खराखुरा अतिसूक्ष्म कीटकही तिथे सुखाने नांदतो. याशिवाय खेडोपाड्यांत, पाणथळ जागी जास्त आढळणाऱ्या पिसवा (फ्ली) १ ते २ मिलिमीटरच्या असतात. हवेत घोंगावणारी चिलटं, घुंगुरटी तशीच. यातील प्रत्येक जण आपल्यासाठी उपद्रवी. वाळवीचे (उधई) पाच-सात सूक्ष्म प्रकार घरातल्या लाकूड सामानाची वाट लावू शकतात. तीही नकळत. ‘डस्ट’ कीटक (माइट्स) तर आपल्या त्वचेच्या वरच्या थरातल्या सूक्ष्म पेशी खाऊन जगतात. ते आपल्याला समजतही नाही. माश्यांमध्ये मधमाश्या उपकारक असतात. मात्र घरमाश्या (हाऊसफ्लाय) अत्यंत त्रासदायक आणि सर्वरोगप्रसारक. अशा माश्यांसारख्या कीटकांच्या सुमारे दीड लाख विविध प्रजाती आहेत. ‘एम. डोमेस्टिया’ प्रकारात घरात प्रादुर्भाव करणाऱ्या माश्यांचा समावेश होतो. एकावेळी शंभर अंडी घालणारी ही माशी रस्त्यावरच्या घाणीपासून घरातल्या अन्नापर्यंत कुठेही संचार करते. काळसर तपकिरी रंगाच्या या सुमारे ६ ते ६ मिलीमीटर वाढणाऱ्या माश्या अन्नावर बसल्या की, त्यांच्या स्पॉन्जी पायांतले आणि लाळेतले विषाणू (बॅक्टेरिया) अन्न दूषित करतात. त्यामुळे खाद्यपदार्थ आणि अन्न उघड्यावर ठेवू नये हे शालेय जीवनापासून शिकवले जाते.

# व्हेरिफिकेशन केल्याशिवाय प्रमाणपत्र देणार नाही

## विखे पाटलांनी स्पष्टच सांगितले

**मुंबई :** राज्य सरकारने हैद्राबाद गॅझेट लागू करण्यासाठीचा जीआर काढला आहे. या माध्यमातून मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासंदर्भात कार्यवाही केली जाणार आहे. या जीआरमुळे ओबीसी समाजाचे आरक्षण धोक्यात येणार असल्याचे मत ओबीसी नेत्यांनी व्यक्त केले आहे. या जीआरला कडाडून विरोध केला आहे. तसेच न्यायालयात जाण्याचाही इशारा दिला आहे.



यातच राज्य सरकारमधील मंत्री पंकजा मुंडे यांनीही बोगस प्रमाणपत्रांचे वाटप होऊ नये असे मत व्यक्त केले होते. त्यांच्या या वक्तव्यावर आता राज्याचे जलसंपदा मंत्री आणि मराठा उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. व्हेरिफिकेशन केल्याशिवाय प्रमाणपत्र दिले जाणार नाही असे विखे पाटील म्हणाले आहेत.

# जिल्हा परिषद अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर



## १८ जिल्हा परिषदा महिलांसाठी राखीव

**मुंबई :** राज्यात दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक पार पडणार आहे. यासाठी राजकीय पक्षांसह आता निवडणूक आयोगानेही तयारीला सुरुवात केल्याचे दिसत आहे. आयोगाकडून ३४ जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. त्यापैकी १८ जिल्हा परिषदा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या. आगामी काळात लवकरच जिल्हा परिषद निवडणुकांचे वेळापत्रकही जाहीर होण्याची शक्यता आहे.

३४ जिल्हा परिषदांमधील अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर झाले आहे. पुणे, रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव जिल्हा परिषदांमध्ये सर्वसाधारण गटासाठी अध्यक्षपद आरक्षित असणार आहे.

रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव, पुणे, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये सर्वसाधारण गटासाठी आरक्षण जाहीर झाले आहे. तर ठाणे, कोल्हापूर, सांगली, धाराशिव, लातूर, अमरावती, गोंदिया, गडचिरोली या जिल्हा परिषदांमध्ये सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आरक्षण जाहीर झाले आहे. सोलापूर, हिंगोली, नागपूर, भंडारा या ठिकाणी पुरुष मागास प्रवर्गासाठी आरक्षण तर रत्नागिरी, धुळे, सातारा, जालना, नांदेड या ठिकाणी महिला मागास प्रवर्गासाठी आरक्षण असणार आहे.

### ३४ जिल्हा परिषदांमधील असे आहे आरक्षण

- ठाणे -सर्वसाधारण (महिला)
- पालघर - अनुसूचित जमाती
- रायगड- सर्वसाधारण
- रत्नागिरी- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
- सिंधुदुर्ग - सर्वसाधारण
- नाशिक -सर्वसाधारण
- धुळे -नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
- नंदूरबार-अनुसूचित जमाती
- जळगांव- सर्वसाधारण
- अहिल्यानगर अनुसूचित जमाती (महिला)
- पुणे-सर्वसाधारण
- सातारा- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
- सांगली- सर्वसाधारण (महिला)
- सोलापूर- नागरिकांचा मागास प्रवर्ग
- कोल्हापूर- सर्वसाधारण (महिला)
- छत्रपती संभाजीनगर- सर्वसाधारण
- जालना- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
- बीड- अनुसूचित जाती (महिला)
- हिंगोली- अनुसूचित जाती
- नांदेड - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
- धाराशिव- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
- लातूर- सर्वसाधारण (महिला)
- अमरावती- सर्वसाधारण (महिला)
- अकोला- अनुसूचित जमाती (महिला)
- परभणी- अनुसूचित जाती
- वाशिम अनुसूचित जमाती (महिला)
- बुलढाणा -सर्वसाधारण
- यवतमाळ सर्वसाधारण
- नागपूर - नागरिकांचा मागास प्रवर्ग
- वर्धा- अनुसूचित जाती
- भंडारा - नागरिकांचा मागास प्रवर्ग
- गोंदिया - सर्वसाधारण (महिला)
- चंद्रपूर - अनुसूचित जाती (महिला)
- गडचिरोली -सर्वसाधारण (महिला)

# प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या जीवन कार्यावर आधारित कार्यक्रम

**रिसोड :** श्री शिवाजी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज रिसोड मध्ये प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या जीवन कार्यावर आधारित कार्यक्रम घेण्यात आला, यामध्ये इयत्ता पहिली ते बारावी च्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.



प्रेषित महंमद पैगंबर यांच्या जीवनावर आधारित या कार्यक्रमांमध्ये वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये भाषण स्पर्धा, प्रेषित महंमद पैगंबर यांच्या जीवनावर आधारित प्रश्नमंजुषा, निबंध स्पर्धा घेण्यात आल्या .या स्पर्धांमध्ये विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयतील जवळपास ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला तसेच रिसोड शहरातील वेगवेगळ्या मशिदीमध्ये आपले कर्तव्य पार पाडणारे मौलवींनी श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मध्ये येऊन भेट दिली असता त्यांचा सत्कार विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संजय देशमुख आणि उपप्राचार्य संजय नरवाडे यांनी केला. यावेळी मंचावरील सर्व मान्यवरांची यथोचित भाषणे झाली कार्यक्रमाचे संचलन मोहम्मद अझहर यांनी तर आभार प्रदर्शन मोहम्मद इल्यास यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उर्दू माध्यमातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका तथा शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. (वि. प्र.)

# लोकशाहीला घातक जन सुरुक्षा विधेयक रद्द करा

## राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे तहसीलदारांना निवेदन

**रिसोड :** लोकशाहीसाठी अत्यंत घातक असलेले जन सुरक्षा विधेयक सरकारने संसदेमध्ये सादर केलेले आहे. हे विधेयक अत्यंत गंभीर स्वरूपाचे असून ते लोकशाहीच्या मूलभूत तत्वांना बाधा आणणारे आहे.



या विधेयकाद्वारे नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर व्यक्ती स्वातंत्र्यावर आणि शांततेत आंदोलन करण्याच्या हक्कावर मर्यादा घालण्याचा प्रयत्न केला जात आहे. या कायद्याचा वापर करून सामान्य नागरिकांना, कार्यकर्त्यांना आणि पत्रकारांना लक्ष केल्या जाऊ शकते. यामुळे हे घातक विधेयक रद्द करावे अशा आशयाचे निवेदन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांनी रिसोड तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर मॅडम यांना दिले आहे.

निवेदनावर जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे, तालुकाध्यक्ष गजाननराव सरनाईक, जिल्हा उपाध्यक्ष कैलासराव खानझोडे, रवींद्र नरवाडे, नितीन सरकटे, मुरलीधर जुनघरे, विनोद खडसे, गणेश पवार, माधवराव शेवाळे, भगवानराव बोडके, रमेश सदार, भगवानराव जाधव, रामभाऊ हुंबाड, पुरुषोत्तम नरवाडे, दत्तराव शिरसाट, डॉक्टर गजानन बाजड हिम्मतराव हुंबाड, गणेश चोपडे, हमेज खान पठाण, सतीश ठाकरे, रूपराव सरनाईक, इत्यादी कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. (वि. प्र)

पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) | R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

